# निर्भिड मतदार हाच सदृढ लोकशाहीचा पाया -प्रा.डॉ.संतोष पाटील

देगलूर- मतदानाचा हक्क लोकशाहीचा आत्मा, केंद्रबिंदू असून सुदृढ लोकशाहीचा पाया मतदान आहे असे प्रतिपादन प्रा.डॉ.संतोष पाटील यांनी केले.

आडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय मतदान दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्रा.डॉ.संतोष पाटील राज्यशास्त्र विभाग प्रमुख, दयानंद कला महाविद्यालय लातूर यांचे 'मतदानाचा अधिकार लोकशाहीचा आधार' या विषयावर गुगलमीटच्या माध्यमातून ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार हे होते. त्यांनी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त सर्व मतदारांना शुभेच्छा दिल्या. तसेच राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याची पार्श्वभूमी सांगितली. प्रमुख वक्ते म्हणून आपले विचार मांडताना प्रा.डॉ. पाटील यांनी राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्त्व सांगितले.

मतदानाचा हक्क लोकशाहीचा आत्मा, केंद्रबिंदू आहे. सुदृढ लोकशाहीचा पाया मतदान आहे. मतदानाचा दिवस सुट्टीचा दिवस असतो हा नकारात्मक भाव बाळगणारा वर्ग लोकशाहीसाठी घातक आहे. मतदानाचा हक्क आपले लोकप्रतिनिधी निवडण्याचा, सरकार बनविण्याचा व सरकार मध्ये बदल करण्याचा अधिकार देतो. मतदानाचा हक्क निर्भिडपणे व निष्पक्षपणे बजवावा युवकांनी उत्स्फुर्तपणे निवडणूकीत सहभाग घेवून मतदानाचा हक्क बजवावा. राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याची भूमिका व उद्दिष्ट्ये याप्रसंगी सांगितली. सक्तीच्या मतदानाचा कायदा करणे लोकशाहीसाठी घातक आहे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. रत्नाकर लक्षटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.माधव चोले यांनी केले तर आभार प्रा.सुक्ष्मा भोसले यांनी मानले.